वाचकांच्या पहिल्या पसंतीचे
मराठी राष्ट्रीय दैनिक

लोकमत

गोवा | शुक्रवार, दि. १३ ऑगस्ट २०१० | पृष्ठे : १२+४+८=२४ किंमत - ₹. २.००

सुनीता नारायण

विशेष दर्जाच्या नावाखाली किनारपट्टी हॉटेलांना खुली करण्याचा डाव

राजू नायक

पणजी, दि. १२ : गोव्यासह मुंबई, नवी मुंबई व केरळची अत्यंत मौल्यवान, त्याचप्रमाणे संवेदनशील किनारपट्टी पुंजीपतींना खुली करून देण्यासाठी केंद्र सरकारमधील हितसंबंधांनी कंबर कसली आहे. स्वामीनाथन समितीला अंधारात ठेवून किनारपट्टी नियमन विभागाची (सीआरझेड) मसुदापूर्व अधिसूचना जारी करण्याच्या प्रकारामुळे, तर खळबळ उडाली असून समितीच चक्रावून गेली आहे.

"केंद्र सरकारने समितीला अंधारात ठेवून आम्ही ज्या सीएमझेडचा (किनारपट्टी व्यवस्थापन विभाग) प्रस्ताव नाकारला होता, तोच मागल्या दाराने आमच्यावर लादण्याचा हा अश्लाघ्य प्रयत्न आहे," असा गंभीर आरोप नवी दिल्लीस्थित विज्ञान व पर्यावरण केंद्राच्या (सीएसई) प्रमुख सुनीता नारायण यांनी आज 'लोकमत'शी बोलताना केला.

नारायण म्हणाल्या, नवीन कायद्यात जर किनारपट्टी कायदा सौम्य केला, तर हॉटेल्स व बांधकाम कंपन्यांच्या घशात संपूर्णतः ती जमीन जाणार आहे. स्वामीनाथन समितीच्या शिफारशी सरकारने बऱ्याचशा स्वतःच्या मर्जीनुसार बदलल्या असून त्यामुळे किनारपट्टीच बांधकामांसाठी खुली होणार आहे. मुंबई महानगर सीआरझेडमधून वगळण्याचा निर्णय स्वामीनाथन

▶▶ पान २ वर

किनारपट्टीवरील बांधकाम बंदी हटविल्यास कोणाला फायदा होऊ शकेल?

- आतिथ्य उद्योग, हॉटेल्स
- खारगी बंदर विकासक
- औष्णिक वीज केंद्रे
- अणुऊर्जा प्रकल्प
- औषध निर्मिती कंपन्या
- जमीन विकासक, बिल्डर



पान १ वरून

किनारपट्टी हॉटेलांना खुली करण्याचा डाव

समितीने घेण्यामागे या शहरातील जुन्या मोडकळीस आलेल्या चाळ
विकास व्हावा, मच्छीमार समाजाला घरे मिळावीत व विकासाला न
चालना मिळावी, हाच उद्देश होता; पण आता हाच 'खास दर्जा' नवी मु
गोवा व केरळला लागू करून ही किनारपट्टी कोणत्याही नियमांप
वगळण्याचे कारस्थान शिजत आहे. "भीती हीच आहे की, हे
सीआरझेडपासून वगळल्यास देशाच्या उर्वरित भागांमधूनही तशी मागणी
लागेल व सर्वांचाच विशेष दर्जासाठी गलबला सुरू होईल," असे
म्हणाल्या. देशाचे सर्वच पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील भाग विकासा
दबावाखाली आलेले असता, किनारपट्टी ही मानवाच्या संरक्षणाचा शेवट
पर्याय ठरली होती. त्यामुळे किनारपट्टीचे संरक्षण सर्वच दृष्टीने महत्त्वाचे होत
असे सांगून नारायण पुढे म्हणाल्या, अनेक राज्य सरकारांनी यापूर्वीच
उद्योजकांना किनारपट्टीवर येऊन उद्योग स्थापन करण्यास आमंत्रण देणे सु
केले आहे. कोकण व गुजरातमध्ये कोळशावर आधारित औष्णिक केंद्र
राहात आहे, नवी बंदरे उभी राहात आहेत व हॉटेलांनी तर ही जमीन केव्
पादाक्रांत केली आहे.

"सर्वांत महत्त्वाचे म्हणजे किनारपट्टीवर उद्योग उभे केले, तर प्र
नियंत्रण प्रकल्प उभारण्यासाठी वेगळा खर्च करावा लागणार नाही. हा व
व प्रदूषण समुद्रात फेकून देण्याचा पर्याय उद्योगांना दिला जात आहे,"
आरोप त्यांनी केला. त्या म्हणाल्या, की किनारपट्टीच्या देखभालीचा प्र
महत्त्वाचा आहे. वनांच्या देखभालीचे कारण देऊन तेथून आदिव
हुसकावून लावण्यात येत असतानाच किनारपट्टीच्या पर्यावरणीय संतुल
कारणावरून तेथील गरीब पारंपरिक मच्छीमार व रहिवाशांना पि
लावण्याचे कारस्थान शिजत असून आदिवासी व पारंपरिक मच्छी
नैसर्गिक वातावरणापासून व त्यांच्या उपजीविकेपासून तोडले जात आहे

स्वामीनाथन समितीने आपला अहवाल गेल्या वर्षी सरकारला
केल्यानंतर त्यात हवे तसे फेरफार केले जात असून गरिबांना किनारपट्
हुसकावून तेथे श्रीमंतांचे इमले उभे करण्याचे हे कारस्थान आहे, अ
म्हणाल्या. सीएमझेडमध्ये ५०० मीटरपर्यंतची बांधकाम बंदी
आवश्यकतेनुसार ही रेषा मागे-पुढे करण्याचा प्रस्ताव होता; पण
गैरप्रकाराला चालना मिळण्याचा धोका लक्षात घेऊन स्वामीनाथन समि
प्रस्तावाला विरोध दर्शविला होता. आता तीच पद्धत अवलंबिण्याचा
चालू आहे, असे सुनीता नारायण म्हणाल्या. सीएसईने गोवा पत्रकार
विद्यमाने गोवा विद्यापीठात किनारपट्टीच्या सुरक्षिततेवर आयोजित केलेल्
दिवसांच्या कृतिसत्रासाठी नारायण यांच्यासह स्वामीनाथन व देशातील
पर्यावरण वैज्ञानिक गोव्यात आले आहेत.